रयत शिक्षण संस्थेचे

# आर्टस्, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर(बुर्ली )

ता. पलूस जि. सांगली

## *अर्थशास्त्र विभाग*

# "सर्वव्यापी आंबेडकर"

**दि.:– 15 जानेवारी 2020**

## अहवाल

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार विद्यार्थ्यांसमोर मांडण्याच्या उद्देशाने महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्यावतीने दि. 15 जानेवारी 2020 रोजी एस. जी. एम. कॉलेज कराड, अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. जी. एस. बनसोडे यांचे "सर्वव्यापी आंबेडकर" या विषयाचे व्याख्यान आयोजित केले होते. डॉ. आंबेडकर हे सर्व जनतेसाठी काम करणारे एक खंबे नेतृत्वं होते. परंतू जनतेने त्यांना विशिष्ट एका जातीच्या चौकटीमध्ये बंधिस्त करून ठेवले आहे. जागतिक दर्जाच्या व्यक्तीला विशिष्ट जातीच्या चौकटीत बंधिस्त करून ठेवल्याबद्दल बनसोडे सरांनी खंत व्यक्त केली. प्रा. बनसोडे सरांनी आपल्या व्याख्यानात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार, राजकीय विचार, सामाजिक विचार, शेती विषयक विचार उदाहरणांसहित पटवून दिले. शेवटी प्रा. बनसोडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक उत्कृष्ट अर्थतज्ञ, राजकीय नेतृत्व, इंजिनियर, सामाजिक व्यक्तिमत्व असे वेगवेगळे गुण असणारे व्यक्तिमत्व होते असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाच्या सुरवातीस अर्थशास्त्र विभागाच्या अर्थदर्पन या भित्तीपत्रकाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच संपूर्ण महाविद्यालयाच्या प्रांगणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व त्यांचा लघु जीवनपटाचे डिजीटल बोर्ड लावण्यात आले होते.

या कार्यकमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम हे होते. कार्यकमाचे सूत्रसंचालन बी. कॉम. भाग तीन ची विद्यार्थीनी कु. योजना जाधव व आभार प्रदर्शन कु. शिवानी पाटील हिने केले. या कार्यकमास अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. शिवानंद भंडारे, डॉ. अमोल कांबळे, प्रा. सागर कुंडले, प्रा. अरूणा कुंभार आदींसह महाविद्यालयातील सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

**लाभार्थी :– 78**

आर्टस, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज बुर्ली रामानंदनगर

**फलनिष्पत्ती :–**

1. उपस्थितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय व आर्थिक विचारांचे ज्ञान मिळाले.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व होते याची जाणीव उपस्थितांना झाली.



पुढारी MY सांगली

## डॉ. आंबडेकर सर्वव्यापी व्यक्तिमत्त्व : प्रा. बनसोडे

**किर्लोस्करवाडी :पुढारी वृत्तसेवा**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण विकासाचे काम केले. त्यांचे काम आणि व्यक्तिमत्व हे सर्वव्यापी होते, असे मत प्रा. जी. एस. बनसोडे यांनी व्यक्त केले. रामानंदनगर (ता. पलूस) येथील आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये अर्थशास्त्र विभागाच्यावतीनेआयोजित 'सर्वव्यापी आंबेडकर' या कार्यक्रमामध्ये ते बोलत होते. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्रा. शिवानंद भंडारे यांनी स्वागत केले. योजना जाधव यांनी सूत्रसंचालन केले. शिवानी पाटील यांनी आभार मानले. डॉ. काकासो भोसले, डॉ. अमोल कांबळे, प्रा. सागर कुंडले, प्रा. अरुणा कुंभार उपस्थित होते.











विभागप्रमुख

प्राचार्य
आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज
रामानंदनगर (बुर्ली)